सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.
Email :-roamravati@dtemaharashtra.gov.in Web :- www.jdroamt.org
Phone :- 0721- 257 3027, 2572577 Fax :- 0721- 257 7913

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्रमांक.:- विकाअ/शिक्षण/प्रशिक्षण/२०२६/2104
दिनांक :- 0 6 AUG 2026

**प्रति,**

**प्राचार्य,**
सर्व शासकीय/अनुदानित/विना-अनुदानित
व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्था, अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- MSFDA व्दारा दिनांक १७ ते २१ ऑगष्ट २०२६ या कालावधीत आयोजित " NariDrishti: Nurturing Visionary Women Leaders for Transformation in Academia" या प्रशिक्षणाबाबत**

**संदर्भ :-** मा.संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचा दिनांक ०३/०८/२०२६ रोजीचा ईमेल

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, MSFDA व्दारा दिनांक **१७ ते २१ ऑगष्ट २०२६** या कालावधीत आयोजित **" NariDrishti:Nurturing Visionary Women Leaders for Transformation in Academia "**या अध्यापक विकास कार्यक्रमांतर्गत शिक्षकाकरीता प्रशिक्षण आयोजित केल्याबाबत संदर्भीय पत्रान्वये या कार्यालयास कळविलेले आहे. या प्रशिक्षणाकरीता आपल्या संस्थेतील संबंधीत विषयाच्या शिक्षकांना पाठविण्यात यावे. तसेच सदर प्रशिक्षणाकरीता लागणारा नोंदणी खर्च व TA/DA संस्थास्तरावर भागविण्यात यावा.

सुलभ संदर्भाकरीता सोबत संदर्भीय पत्र जोडलेले असून त्याप्रमाणे आवश्यक कार्यवाही करावी.
नोंदणीसाठी Flyer मधील QR Code /सुचनांनुसार कार्यवाही करावी.
कार्यक्रमांसंबंधी अधिक माहितीसाठी ७३९१०००७२२ या नंबर वरती संपर्क करावा.

सहपत्र :- वरील प्रमाणे.

( डॉ.व्ही.आर.मानकर )
**प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,**
अमरावती.

प्रत :- प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.

**Duration:** 5 days (residential)
**Dates:** 17 - 21 August 2026
**Venue:** MSFDA Pune
**Eligibility:** Women Teaching/Administrative staff members across all disciplines of H&TEIs in Maharashtra
**Registration Fee:** Rs.1000/-

**Have attached the following -**

1. Request Letter to the Director (Technical Education)
2. Program Flyer

Request you to kindly issue a letter to the Regional Joint Directors for further communication so that there will be good participation from colleges across Maharashtra.

Sincerely,


महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था

Kabeer Palshikar
Manager – Networking
- 8308381840, 7262079089
Maharashtra State Faculty Development Academy (MSFDA)
Model Colony, Shivajinagar, Pune, Maharashtra 411016


For regular updates follow MSFDA's official WhatsApp Channel - https://whatsapp.com/channel/0029VahEklz6LwHkocGGlU3e

---

**2 attachments**




**NariDrishti_17-21 Aug 2026.jpg.jpeg**
290K

**Letter to DTE_NariDrishti-17-21 AUg.pdf**
217K

MSFDA
Maharashtra State
Faculty Development Academy

+91 72620 79089
msfda.mh@gmail.com
412-B, Bhamburda, Bahirat Patil Chowk
Model Colony, Shivajinagar, Pune, Maharashtra 411016
www.msfda.org.in

Sr. No. MSFDA/२०२६-२७/ 497 दिनांक: - २३/०७/२०२६

प्रति,
संचालक (तंत्र शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मुंबई

विषय — महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्थेमार्फत (MSFDA) अध्यापकांसाठी घेण्यात येणाऱ्या प्रशिक्षण कार्यक्रमांची उद्घोषणा सहसंचालक, तंत्र शिक्षण (JD) यांचेमार्फत त्यांच्या विभागातील महाविद्यालयाचे प्राचार्यांना पाठविणेविषयी..

महोदय,

महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्थेची (MSFDA) स्थापना भारतीय कंपनी कायदा, २०१३ मधील कलम ८ अन्वये महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने, अध्यापकांचे प्रशिक्षणासाठी केली आहे हे आपणांस विदित आहे.

महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्थेमार्फत विविध अध्यापक विकास प्रशिक्षण कार्यक्रमांचे (Faculty Development Programme-FDP) आयोजन करण्यात येते. यातील काही प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्थेमार्फत केले जाते, तर काही प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन करण्यासाठी महाराष्ट्रातील अनेक नामवंत शिक्षण संस्था, प्रशिक्षण संस्था, विद्यापीठे यांच्याशी सामंजस्य करार केले आहेत.

उपरोक्त विषयास अनुसरून महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्थेने नेतृत्व विकास केंद्रांतर्गत महाराष्ट्रातील विद्यापीठ व महाविद्यालयांतील महिला संचालक, प्राचार्य, उपप्राचार्य, विभागप्रमुख व प्राध्यापकांसाठी NariDrishti: Nurturing Visionary Women Leaders for Transformation Academia या प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन माहे ऑगस्ट २०२६ मध्ये केले आहे.

या प्रशिक्षण कार्यक्रमाचा तपशिल पुढीलप्रमाणे —

| | |
|---|---|
| **Name Of Programme:** | NariDrishti: Nurturing Visionary Women Leaders for Transformation Academia |
| **Venue:** | MSFDA Campus, Pune |
| **Date:** | 17th to 21st August 2026 |
| **Eligibility: -** | Women faculty from all disciplines in higher education |
| **Batch Size:** | 40 |
| **Link for Registration:** | https://apps.msfda.ac.in/ |

उपरोक्त अध्यापक विकास प्रशिक्षण कार्यक्रमांत (FDP) महाराष्ट्रातील सर्व विभागातील महाविद्यालयांतुन (अनुदानित, विनाअनुदानित, खाजगी, स्वायत्त इत्यादी) सहभाग नोंदविला जाणे अपेक्षित आहे. तरी या प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये सहभाग नोंदविण्यासाठी प्रत्येक विभागातील महाविद्यालयाचे प्राचार्यांना सह संचालक (JD) यांचे मार्फत सुचना देण्यात यावी ही विनंती. या संदर्भात महाविद्यालयाचे प्राचार्यांना पाठविलेल्या पत्राची प्रत संलग्न करण्यात आली आहे. अधिक माहितीसाठी संपर्क: सविता शिंगारे— ७३९१०००७२२.

धन्यवाद,
भवदीय

डॉ. शैलेंद्र देवळाणकर
कार्यकारी संचालक,
महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था, पुणे.

महाराष्ट्र राज्य अध्यापक
विकास संस्था, पुणे.